महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार



छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : ३०७ वे | दिनांक : ०४/११/२०२६ | वार : बुधवार

महाराष्ट्राच्या आरोग्य यंत्रणेला बळ; १,४४० डॉक्टरांना नियुक्ती आदेश



मुंबई : राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचे पाऊल उचलले आहे. राज्यातील शासकीय रुग्णालयांमधील डॉक्टरांची कमतरता दूर करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाकडून 1 हजार 440 वैद्यकीय अधिकाऱ्यांना नियुक्ती आदेश देण्यात येणार आहेत. यामध्ये 674 विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी आणि 766 एमबीबीएस डॉक्टरांचा समावेश आहे. या नियुक्ती आदेशांचे वितरण करण्यासाठी उद्या, 4 नोव्हेंबर रोजी विशेष समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या निर्णयामुळे राज्यातील ग्रामीण, दुर्गम आणि आदिवासी भागातील आरोग्यसेवेला मोठे बळ मिळण्याची अपेक्षा आहे. राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आणि वेळेत वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने रिक्त पदे भरण्याच्या प्रक्रियेला प्राधान्य दिले आहे. विशेषतः ग्रामीण भागातील प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांची उपलब्धता वाढविणे आवश्यक होते. अनेक शासकीय आरोग्य संस्थांमध्ये डॉक्टरांची पदे रिक्त असल्याने सध्या कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकाऱ्यांवर कामाचा अतिरिक्त ताण येत आहे. तसेच अनेकदा रुग्णांना उपचारांसाठी मोठ्या शहरांतील रुग्णालयांमध्ये जावे लागत आहे. ही परिस्थिती बदलण्यासाठी 1,440 वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नियुक्त्या महत्त्वपूर्ण ठरणार आहेत. महाराष्ट्र वैद्यकीय व आरोग्य सेवा गट-अ (एस-20) संवर्गातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या एकूण 2 हजार 514 पदांपैकी 1 हजार 440 पदांच्या भरतीसाठी 27 फेब्रुवारी 2026 रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या भरती प्रक्रियेत 674 विशेषज्ञ वैद्यकीय अधिकारी आणि 766 एमबीबीएस वैद्यकीय अधिकारी अशा एकूण 1 हजार 440 पदांचा समावेश आहे. या सर्वांना नियुक्ती आदेश वितरित करण्यासाठी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या भरतीतील विशेषज्ञ डॉक्टरांच्या नियुक्त्यांमुळे शासकीय रुग्णालयांमध्ये विविध वैद्यकीय शाखांमधील उपचार सुविधा अधिक सक्षम करता येणार आहेत. ग्रामीण रुग्णालये, उपजिल्हा रुग्णालये आणि जिल्हा रुग्णालयांमध्ये विशेषज्ञ डॉक्टर उपलब्ध झाल्यास रुग्णांना स्थानिक पातळीवरच आवश्यक उपचार मिळण्यास मदत होईल. दुसरीकडे, 766 एमबीबीएस डॉक्टरांच्या नियुक्त्यांमुळे प्राथमिक आरोग्य केंद्रासह अन्य शासकीय आरोग्य संस्थांमधील नियमित रुग्णसेवा अधिक प्रभावी होण्याची अपेक्षा आहे. राज्यातील ग्रामीण, डोंगराळ, दुर्गम आणि आदिवासी भागांमध्ये आरोग्य सुविधांपर्यंत पोहोचणे आजही अनेक नागरिकांसाठी आव्हानात्मक आहे. काही भागांमध्ये डॉक्टरांची कमतरता असल्याने रुग्णांना साध्या आजारांच्या उपचारांसाठीही दूरच्या शहरांमध्ये जावे लागते. विशेषतः गर्भवती महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना याचा अधिक त्रास सहन करावा लागतो. नव्या नियुक्त्यांमुळे अशा भागांतील आरोग्य संस्थांमध्ये डॉक्टरांची उपलब्धता वाढण्यास मदत होणार आहे. अपघात, प्रसूती, सर्पदंश, संसर्गजन्य आजार आणि इतर वैद्यकीय आपत्कालीन परिस्थितींमध्ये रुग्णांना वेळेत उपचार मिळण्याची शक्यता वाढेल. तसेच माता व बाल आरोग्य सेवा, नियमित आरोग्य तपासणी, आजारांचे निदान आणि उपचार यांसारख्या सेवांनाही गती मिळू शकते.

गरजूंसाठी मदत सोसायटीची स्थापना

मुंबई : राज्यातील दुष्काळग्रस्त नागरिकांसह आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या रुग्णांना आता अधिक आर्थिक मदत मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे. मुख्यमंत्री सहायता निधीच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या मदतीला आता सामाजिक सहभागाचे बळ मिळणार असून, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'ची स्थापना करण्यात आली आहे. कंपन्या, सामाजिक संस्था, देणगीदार आणि दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून अतिरिक्त निधी उभारून तो गरजू रुग्णांच्या उपचारांसह नैसर्गिक आपत्ती आणि अन्य संकटांमध्ये बाधित झालेल्या नागरिकांच्या मदतीसाठी वापरण्यात येणार आहे. त्यामुळे महागड्या वैद्यकीय उपचारांचा खर्च परवडत नसलेल्या रुग्णांना मोठा दिलासा मिळण्याची अपेक्षा आहे. राज्यात अनेकदा आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने गंभीर आजारांवरील उपचारांचा खर्च सामान्य कुटुंबांना पेलणे कठीण होते. हृदयरोग, कर्करोग, मूत्रपिंडविकार आणि मेंदूविकार यांसारख्या गंभीर आजारांवर उपचार करण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च येतो. काही रुग्णांना शस्त्रक्रिया, महागडी औषधे तसेच दीर्घकालीन उपचारांची आवश्यकता असते. अशा परिस्थितीत आर्थिक अडचणींमुळे उपचारांमध्ये अडथळे निर्माण होतात. ही गरज लक्षात घेऊन मुख्यमंत्री सहायता निधीच्या मदतकार्यात अधिक संसाधने उपलब्ध व्हावीत, यासाठी नव्या सोसायटीची स्थापना करण्यात आली आहे. 'महाराष्ट्र पब्लिक रिलीफ सोसायटी'च्या माध्यमातून गंभीर आजारांनी ग्रस्त असलेल्या गरजू रुग्णांसाठी अतिरिक्त आर्थिक मदत उभारता येणार आहे.

पूर्णेकर प्रकरणाचा तपास सुरूच; विरोधकांवर शिरसाटांचा आरोप

छत्रपती संभाजीनगर : प्रदीप पूर्णेकर प्रकरणावरून सध्या राजकीय वातावरण तापले असून, या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर मंत्री संजय शिरसाट यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे. पोलिसांकडून या प्रकरणाचा तपास त्यांच्या पद्धतीने सुरू आहे. मात्र, विरोधक जाणीवपूर्वक या प्रकरणाला राजकीय रंग देत ते अधिक चिघळवण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप शिरसाट यांनी केला. कोणताही आरोपी असो, तो कोणत्याही पक्षाचा असला तरी त्याच्यावर योग्य ती कारवाई झाली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. पूर्णिमा हत्याकांड प्रकरणात विरोधकांकडून घेतल्या जाणाऱ्या भूमिकेवरही शिरसाट यांनी नाराजी व्यक्त केली. या प्रकरणात विरोधकांकडून जाणीवपूर्वक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे नाव घेण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे ते म्हणाले. पोलिसांनी या प्रकरणाचा निष्पक्षपणे तपास करावा, अशी भूमिका स्वतः मुख्यमंत्र्यांनीही मांडली आहे. मुख्यमंत्र्यांनी पोलिसांना त्यांच्या पद्धतीने तपास करण्यास सांगितले असताना विरोधकांकडून वारंवार या प्रकरणाचा राजकीय मुद्दा केला जात असल्याचे शिरसाट यांनी सांगितले. पूर्णिमा हत्याकांड प्रकरणात नेमके काय घडले, याचा तपास पोलीस करत आहेत. या तपासात कोणाचाही हस्तक्षेप नसावा. विरोधकांना खरोखरच पूर्णिमाच्या हत्येबद्दल दुःख असेल, तर त्यांनी पोलिसांना सहकार्य करावे. तपास कुठपर्यंत पोहोचला आहे, याची माहिती घ्यावी; मात्र या प्रकरणाला राजकीय रंग देण्याचा प्रयत्न करू नये, असे शिरसाट म्हणाले.या प्रकरणात जो कोणी आरोपी असेल, त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे. आरोपी कोणत्या पक्षाचा आहे, याचा विचार न करता कायद्यानुसार कारवाई होणे आवश्यक आहे. असे सर्वांचे मत असताना विरोधकांकडून या प्रकरणावरून राजकारण का केले जात आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसमधील अंतर्गत घडामोडी आणि पक्षात फूट पडण्याच्या चर्चांवरही संजय शिरसाट यांना प्रश्न विचारण्यात आला. राष्ट्रवादीचे दोन गट आणि त्यातील काही नेत्यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची घेतलेली भेट यामुळे राजकीय वर्तुळात संभ्रम निर्माण झाल्याचे ते म्हणाले. मात्र, राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये नेमके काय सुरू आहे, याची अधिकृत माहिती आपल्याकडे नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. हा संभ्रम दूर करण्यासाठी अजित पवार गटातील वरिष्ठ नेत्यांनी आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांनी आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे. त्यांच्या पक्षात फूट पडणार की नाही, यावर आपण भाष्य करणार नसल्याचेही शिरसाट यांनी सांगितले.



महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०४ नोव्हेंबर २०२६

जीवन विकास ग्रंथालयाच्या वाचक व्यासपीठाची ११ वी बैठक संपन्न



छत्रपती संभाजीनगर : बालसाहित्य हे केवळ मुलांचे मनोरंजन करणारे माध्यम नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देणारे आणि जीवनाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी देणारे प्रभावी साधन आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध बालकादंबरीकार डॉ. विशाल तायडे यांनी केले. जीवन विकास ग्रंथालयाच्या वाचक व्यासपीठाच्या ११ व्या साप्ताहिक बैठकीतील 'साहित्यिक संवाद' कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी व्यासपीठावर जीवन विकास ग्रंथालयाचे कार्यवाह डॉ. राजशेखर बालेकर आणि बालसाहित्यिक डॉ. विनोद सिनकर उपस्थित होते. 'ढ' या बालकादंबरीच्या निर्मितीमागील प्रेरणा, तिची संकल्पना, लेखनप्रक्रिया आणि वाचकांकडून मिळालेला प्रतिसाद यांविषयी डॉ. तायडे यांनी आपले अनुभव कथन केले. मुलांच्या भावविश्वाचा वेध घेताना त्यांच्या जिज्ञासेला, कल्पनाशक्तीला आणि आत्मविश्वासाला प्रोत्साहन देणारे साहित्य निर्माण करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. बालसाहित्याच्या माध्यमातून मुलांना जीवनातील विविध अनुभवांची ओळख करून देता येते. मुलांच्या मनात संवेदनशीलता, निसर्गप्रेम, माणुसकी आणि सकारात्मक विचार रुजविण्यात साहित्याची महत्त्वाची भूमिका असते. मुलांना उपदेश करण्यापेक्षा त्यांच्या भावविश्वाशी जोडणाऱ्या कथा आणि व्यक्तिरेखांच्या माध्यमातून जीवनमूल्ये सहजपणे पोहोचवता येतात, असा विचार या संवादातून पुढे आला. अनेक पुरस्कारांनी गौरविलेल्या 'ढ' मधून बालकादंबरीकार डॉ. विशाल तायडे यांनी बालमनाचे विश्व उलगडले असल्याचे मत उपस्थित रसिक वाचकांनी व्यक्त केले . लेखक आणि वाचक यांच्यात थेट संवाद घडवून आणणाऱ्या या उपक्रमामुळे साहित्याकडे पाहण्याची नवी दृष्टी मिळाल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. सोमवार, २ नोव्हेंबर रोजी ग्रंथालयाच्या ग्रंथमित्र भा. बा. आर्वीकर सभागृहात हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमात उपस्थित साहित्यप्रेमी आणि वाचकांनी डॉ. तायडे यांच्याशी संवाद साधत त्यांच्या लेखनप्रवासाविषयी जाणून घेतले. जीवन विकास ग्रंथालयातर्फे वाचक व्यासपीठाच्या माध्यमातून वाचनसंस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी आणि साहित्यिक विचारांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले जात आहेत. या उपक्रमांतर्गत आयोजित करण्यात आलेल्या या साहित्यिक संवादाला साहित्यप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या कार्यक्रमाला डॉ. संतोष भूमकर, प्रा. गो. रा. तायडे, गझलकार गिरीश जोशी, कवी सुनील डोके, संगीता मंडलिक, नृसिंह कुलकर्णी, मनोज तुळपुळे, गुलाबराव मगर, प्रकाशक मिलिंद जगताप , जीवन कुलकर्णी, सौ. मोहिनी किनगावकर, देवीदास देशपांडे, श्री. व सौ. चिमणपुरे, श्री. व सौ. बहिवाळ, मारुती फुलारी, सौ. सुवर्णलता ठाकूर, डी. पी. सराफ, गोकुळ इंगळे, राजशेखर जाबा आणि सौ. संगिता मंडलिक आदी मान्यवरांसाह अनेक रसिक वाचक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विनोद सिनकर यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. राजशेखर बालेकर यांनी केले.



बिग बींच्या सुरक्षेवरून काँग्रेसचा मोदी सरकारवर निशाणा





मुंबई : महानायक अमिताभ बच्चन यांच्या 'जलसा' बंगल्याबाहेर चाहत्यांना अभिवादन करण्यासाठी वापरण्यात आलेली अत्याधुनिक बुलेटप्रूफ काचेची केबिन सध्या देशभरात चर्चेचा विषय ठरली आहे. दिलजीत दोसांझ संबंधित हल्ल्याच्या घडामोडी, टायगर श्रॉफवरील गोळीबार आणि खुद्द अमिताभ बच्चन यांचा 'जलसा' बंगला उडवून देण्याच्या आलेल्या गंभीर धमक्यांनंतर मुंबई पोलिसांनी त्यांची सुरक्षा व्यवस्था कमालीची कडक केली आहे. रविवारी हजारो चाहत्यांचे अभिवादन स्वीकारताना बिग बी मुलगा अभिषेक बच्चनसह थेट एका बुलेटप्रूफ काचेच्या मंचावरून (ट्रॉली) समोर आले. मात्र, यावरून आता राजकीय टोलेबाजी सुरू झाली असून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व मुख्य प्रवक्ते सचिन सावंत यांनी केंद्र सरकार आणि अमिताभ बच्चन यांच्यावर उपरोधिक शब्दांत जोरदार हल्ला चढवला आहे. "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बॉलिवूड कलाकारांसाठी तातडीने 'विशेष नमो बॉलिवूड जीवन सुरक्षा योजना' जाहीर करावी आणि 'दीवार' सिनेमात दाखवल्याप्रमाणे प्रत्येक कलाकाराला 'बिल्ला क्रमांक ७८६' चे वाटप करावे," असा टोला सचिन सावंत यांनी लगावला आहे. गेल्या कित्येक दशकांपासून दर रविवारी अमिताभ बच्चन हे जुहू येथील आपल्या 'जलसा' बंगल्याच्या प्रवेशद्वारावर येऊन देशभरातून जमलेल्या हजारो चाहत्यांना हात जोडून अभिवादन करतात. बॉलिवूड सेलिब्रिटींना येत असलेल्या धमक्यांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी सुरक्षा नियमावली अधिक कडक केली आहे. त्यामुळे रविवारी बिग बी थेट उघड्या मंचावर न येता, चारी बाजूंनी बुलेटप्रूफ काचेने सुरक्षित केलेल्या एका विशेष फिरत्या केबिनमधून चाहत्यांसमोर आले. या वेळी त्यांच्यासोबत मुलगा अभिनेता अभिषेक बच्चन हादेखील उपस्थित होता. बिग बींनी नेहमीप्रमाणे हात उंचावून, हात जोडून चाहत्यांच्या प्रेमाला प्रतिसाद दिला असला, तरी या बुलेटप्रूफ काचेच्या केबिनचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल झाले असून नेटिझन्सकडून त्यावर संमिश्र प्रतिक्रिया उमटत आहेत. अमिताभ बच्चन यांच्या बुलेटप्रूफ केबिनवरून काँग्रेस नेते सचिन सावंत यांनी केंद्रातील मोदी सरकार आणि अमिताभ बच्चन यांच्या दुटप्पी भूमिकेवर तीव्र आक्षेप घेतला. "अमिताभ बच्चन आणि बॉलीवूडमधील इतर कलाकारांकरिता केंद्र सरकारने तातडीने 'विशेष नमो बॉलिवूड जीवन सुरक्षा योजना' जाहीर करावी, अशी आमची जाहीर मागणी आहे. या योजनेंतर्गत 'दीवार' चित्रपटात दाखवल्याप्रमाणे प्रत्येक कलाकाराला 'बिल्ला क्रमांक ७८६' चे वाटप करण्यात यावे, जेणेकरून ते सुरक्षित राहतील," असा सणसणीत टोला त्यांनी लगावला. "2014 पूर्वी मनमोहन सिंग यांच्या सरकारच्या काळात जेव्हा पेट्रोलच्या दरात थोडी वाढ व्हायची किंवा रुपयाचे अवमूल्यन व्हायचे, तेव्हा अमिताभ बच्चन तत्परतेने उपरोधिक ट्वीट्स करायचे. आता देशात कायदा-सुव्यवस्थेचे तीनतेरा वाजले असताना आणि स्वतः कलाकारांना बुलेटप्रूफ काचेच्या मागे लपावे लागत असताना, बिग बींनी 'मोदी है तो मुमकिन है' आणि 'देश सुरक्षित हाथों में है' असे एक तरी ट्वीट करून दाखवावे, अशी संपूर्ण देशाची अपेक्षा आहे," असे सावंत म्हणाले.

जालन्याच्या साडीच्या प्रचारासाठी रॅम्प वॉक करेन - पंकजा मुंडे

जालना : 'बॉम्बे टाइम्स फॅशन वीक'मध्ये जालना जिल्ह्यातील शेतकरी महिलांनी तयार केलेल्या 'जालनाई' साडीचे प्रमोशन करण्यासाठी मंत्री पंकजा मुंडे यांनी केलेल्या रॅम्प वॉकवरून सध्या मोठे राजकारण तापले आहे. विरोधकांनी दुष्काळाचे कारण देत त्यांच्यावर जोरदार टीका केली. या सर्व टीकेला आज स्वतः पंकजा मुंडे यांनी पत्रकार परिषदेत सडेतोड उत्तर दिले आहे. "मला रॅम्प वॉक करण्याची कोणतीही हौस नाही, पण ग्रामीण महिलांच्या खिशात चार पैसे जात असतील, तर त्यांच्यासाठी मी पुन्हा रॅम्पवर जाईन," असा पलटवार त्यांनी केला आहे. रॅम्प वॉकवरून होणाऱ्या टीकेला उत्तर देताना पंकजा मुंडे म्हणाल्या, "मी गेल्या २२ वर्षांपासून राजकारणात सक्रिय आहे आणि ग्रामीण भागाचे प्रतिनिधित्व करते. ग्रामीण महिलांना न्याय मिळावा, त्यांच्या कामाला ओळख मिळावी यासाठीच मी तो रॅम्प वॉक केला. 'बॉम्बे टाइम्स फॅशन वीक'मध्ये जालन्यातल्या महिलांचा स्टॉल लागणे आणि सेलिब्रिटी, मॉडेल्सनी त्या साड्या पाहून ऑर्डर्स देणे, ही फार मोठी गोष्ट आहे." त्या पुढे म्हणाल्या, "मला रॅम्प वॉक करण्याची काहीही हौस नाही. विरोधकांच्या या टीकेला उत्तर देण्याचीही मला आवश्यकता वाटत नाही. पण जर माझी जालन्यातली साडी मुंबईतली एखादी महिला विकत घेत असेल आणि तो पैसा माझ्या जालन्याच्या महिलेच्या खिशात जाणार असेल, तर त्या महिलांसाठी मी परत जाऊन रॅम्प वॉक करेन." राष्ट्रवादीच्या (अजित पवार गट) नेत्यांनी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची घेतलेली भेट आणि सुरू असलेल्या राजकीय हालचालींवर बोलण्यास त्यांनी स्पष्ट नकार दिला. "मी यावर काय टिप्पणी करणार? ज्या दोन जणांची भेट झाली, तेच यावर बोलू शकतील. मी यावर भाष्य करणे उचित नाही," असे त्या म्हणाल्या.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०४ नोव्हेंबर २०२६

लेखकांची दिवाळी

दिवाळी सण म्हटला की बऱ्याच दिवसांची प्रतीक्षा असते. पंचमी, पोळा, गणपती, नवरात्र, दसरा आणि मग वेध लागतात ते दिवाळीचे. सुट्ट्या लागल्या की प्रत्येकाचे प्लॅन वेगवेगळे ठरतात. माझेही ठरलेलेच असते. गावाकडे भेट देणे, विविध स्थळांना भेटी देणे, नातेवाईकांच्या भेटी घेणे हे माझे ठरलेलेच असते. बाहेरगावी जाणे, मित्र, ज्येष्ठ मार्गदर्शक यांच्या भेटी घेणे, खरेदी करणे या सगळ्याची एक वेगळीच मजा असते. दिवाळीला खरेदीला उधाणच आलेले असते. कपडे, दागिने, फराळ, फटाके, रांगोळी, आकाशकंदील यांनी बाजारपेठा फुलून जातात. पण या सर्व गडबडीत, या झगमगाटात लेखकाचा आणि खऱ्या वाचकाचा जीव मात्र एकाच ठिकाणी गुंतलेला असतो आणि ती जागा म्हणजे दिवाळी अंक.महाराष्ट्राला दिवाळी अंकांची एक मोठी आणि समृद्ध परंपरा लाभली आहे. पहिला दिवाळी अंक १९०९ साली मनोरंजन या नावाने प्रसिद्ध झाला. काशिनाथ रघुनाथ मित्र यांनी तो काढला होता. त्या काळात दिवाळी अंक हे केवळ करमणुकीचे साधन नव्हते तर प्रबोधनाचे मोठे माध्यम होते. स्वातंत्र्यपूर्व काळात लोकांना जागृत करण्याचे काम या अंकांनी केले. मौज, किर्लोस्कर यांसारख्या नियतकालिकांनी ही परंपरा पुढे रुजवली आणि आज एकशे पंधरा वर्षांनंतर ती परंपरा केवळ टिकून नाही तर हजारो अंकांच्या रूपाने अधिकच बहरली आहे. आज काही दिवाळी अंक साहित्य संस्थांकडून काटेकोर नियोजनाने प्रसिद्ध होतात तर काही वैयक्तिक संपादक आपल्या जिव्हाळ्याच्या विषयाला वाहून घेऊन अंक काढतात. संस्थात्मक अंकात एका विशिष्ट थीमभोवती लेखन गुंफलेले असते तर वैयक्तिक अंकात संपादकाच्या आवडी निवडीचा आणि त्याच्या साहित्यिक जाणिवेचा प्रत्यय येतो. दोन्ही प्रकारच्या अंकांचे आपापले महत्त्व आहे आणि दोन्हीही वाचकांना समृद्ध करतात.दिवाळी अंकाची खरेदी हा एक अवर्णनीय आनंद असतो. बुक स्टॉलला भेट देणे, तिथे रचलेले रंगीबेरंगी अंक पाहणे, त्यांची मुखपृष्ठे न्याहाळणे आणि मग हळुवारपणे एक एक अंक हातात घेऊन चाळणे यासारखा आनंद दुसरा नाही. प्रत्येक अंकाचे मुखपृष्ठ हे एक स्वतंत्र कलाकृती असते. एखाद्या चित्रकाराने महिनाभर मेहनत घेऊन ते साकारलेले असते. ते मुखपृष्ठ केवळ आकर्षक नसते तर अंकाच्या आतील विषयाची ओळख करून देणारे आणि वेगळेपण सांगणारे असते. काही मुखपृष्ठे इतकी बोलकी असतात की अंक न वाचताही त्याचा विषय लक्षात येतो. स्टॉलवर गेल्यावर प्रथम सर्व अंकांवर एक नजर टाकायची, कोणत्या विषयावर कोणते अंक आले आहेत याची माहिती घ्यायची, मग अनुक्रमणिका पाहायची, लेखकांची नावे वाचायची आणि मग आपल्या आवडीच्या विषयावरचे अंक निवडून खरेदी करायचे. हा सगळा सोहळाच असतो.मी दरवर्षी छत्रपती संभाजीनगरातील सर्व बुक स्टॉलना भेट देतो. शहरातील औरंगपुरा येथे अनेक स्टॉलवर मी भेटी देतो. तिथे पुस्तकांचे मोठे दालनच असते. त्याचबरोबर सिडको कॅनॉट येथील गुरु बुक स्टॉलवरील माझी भेट तर ठरलेलीच असते. अनेक वर्षांपासून मी तिथे जातो आहे. तिथले मालक आता माझे मित्रच झाले आहेत. ते आपुलकीने विचारतात की सर यंदाचा कोणता अंक राहिला. तिथे गेल्यावर अर्धा पाऊण तास कसा निघून जातो कळतच नाही. शहरातील सर्व स्टॉलना भेटी दिल्याशिवाय दिवाळी झाल्यासारखे वाटतच नाही.अंक घेऊन झाल्यावर खरी मजा सुरू होते ती चर्चेची. जाणकार लेखक आणि वाचक यांच्याशी त्या अंकांवर चर्चा करणे, सर्वात चांगला अंक कोणता यावर वादविवाद करणे, एखाद्या लेखावर, कथेवर मत मांडणे हा आमच्या दिवाळीचा अविभाज्य भाग आहे. लेखकांच्या आणि मान्यवरांच्या भेटी घेणे हेही ठरलेलेच असते. एखाद्या ज्येष्ठ लेखकाकडे जाऊन त्यांच्या लेखाबद्दल बोलणे, त्यांच्याकडून नवीन अंकांची माहिती घेणे यात एक वेगळाच आनंद आहे. आज वाचकांची अभिरुची बदलली आहे. पूर्वी केवळ कथा कवितांना पसंती मिळायची, आता मात्र वैचारिक किंवा विशिष्ट विषयावरील अंक वाचक अधिक पसंत करतात. सामाजिक, राजकीय, पर्यावरणीय, शेतीविषयक प्रश्नांवर भाष्य करणाऱ्या अंकांना मागणी वाढली आहे. वाचक आता केवळ मनोरंजन शोधत नाही तर त्याला आत्मभान देणारे, विचार करायला लावणारे लेखन हवे आहे.मला नेहमीच काही ठराविक अंकांची ओढ असते. अक्षरदान, संस्कृती, मौज, सकाळ, लोकमत, वाघूर, शब्दशिवार, भवताल, ॲग्रोवन, शब्दालय, छंद हे अंक मी दरवर्षी आवर्जून घेतो. प्रत्येकाची एक वेगळी ओळख आहे. यावर्षी भवताल, छंद, वाघूर हे अंक मला विशेष भावले. भवताल पर्यावरण आणि माणसाच्या नात्यावर प्रकाश टाकतो, छंद माणसाच्या जगण्यातल्या छोट्या आनंदाची गोष्ट सांगतो तर वाघूर वैचारिक मंथन घडवतो. यात माझा सर्वात आवडता अंक म्हणजे ॲग्रोवन. शेतकरी, शिवार, पाणी, माती यावर काम करणारा कार्यकर्ता म्हणून ॲग्रोवन हा माझ्यासाठी केवळ दिवाळी अंक नाही तर संदर्भ ग्रंथच आहे. शेती, हवामान, बाजारपेठ, नवीन तंत्रज्ञान, शेतीपूरक उद्योग यावरचे अभ्यासपूर्ण लेख या अंकात असतात. दुष्काळावर मात करण्याच्या उपायांपासून ते शेतमालाच्या मूल्यवर्धनापर्यंतचे विषय त्यात हाताळलेले असतात. म्हणूनच ॲग्रोवन हा माझा पहिला आणि आवडता दिवाळी अंक आहे.या अंकांचे वैशिष्ट्य म्हणजे ते एकदा वाचून संपत नाहीत. वर्षभर ते अंक पुन्हा पुन्हा हाताळणे, चाळणे, त्यातील एखाद्या लेखाचा संदर्भ शोधणे हा आनंदच निराळा असतो. दिवाळी संपली तरी हे अंक वर्षभर आपल्याला बौद्धिक फराळ पुरवत असतात.यामध्ये विशेष उल्लेख करावा लागेल तो तिफणने काढलेल्या विशेषांकांचा. तिफणने दिवाळी अंकाची संकल्पनाच बदलून टाकली. त्यांनी केवळ सर्वसामान्य अंक न काढता थीमवर आधारित विशेषांक काढले आणि ते प्रचंड चर्चेचे ठरले. नदी विशेषांक, झाडीपट्टी रंगभूमी विशेषांक, लोकवाद्ये विशेषांक यांनी महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीला, लोककलेला आणि निसर्गाला नवी ओळख दिली. नदी विशेषांकात महाराष्ट्रातील नद्यांची व्यथा मांडली होती, झाडीपट्टी विशेषांकाने विदर्भातील दुर्लक्षित रंगभूमीला प्रकाशझोतात आणले तर लोकवाद्ये विशेषांकाने लोप पावत चाललेली वाद्ये आणि वादक यांना व्यासपीठ मिळवून दिले. असे प्रयोग दिवाळी अंकाला अधिक समृद्ध करतात.खरे तर लेखक आणि वाचकांची खरी दिवाळी हीच. जिथे अंधाराकडून प्रकाशाकडे जाण्याचा मार्ग केवळ दिव्यांनी नाही तर अक्षरांनीही प्रकाशित होतो. दिवाळीच्या फराळासोबतच विचारांचा फराळही तेवढाच महत्त्वाचा आहे.उर्वरित दिवाळी गावाकडे आपल्या माणसांसोबत घालवायची आहे. गावशिवारात मनसोक्त भटकंती करायची आहे. पिशवीत मात्र ॲग्रोवनसह चार पाच आवडते अंक असणारच आहेत. मग पुन्हा शहराकडे धाव आणि पुढच्या दिवाळीची आणि पुढच्या दिवाळी अंकांची वाट पाहत राहायचे.

डॉ. शिवाजी हुसे
कन्नड

विद्यापीठाच्या अभ्यासक्रमातील गझलांजली संग्रह अय्युब पठाण यांना भेट



छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर औरंगाबादच्या जून 2026 पासून नवीन अभ्यासक्रमानुसार बी. ए. पदवी तृतीय वर्ष अभ्यास पत्रिका पाचवेसाठी विशेष विषयासाठी उपयुक्त सत्र क्रमांक पाचवे हे गजलांजली हा गझलसंग्रह कैलास पब्लिकेशन छत्रपती संभाजीनगरचे अनिल अतकरे यांनी साहित्यिक अय्युब पठाण लोहगावकर यांना दिवाळीनिमित्ताने हा गझलसंग्रह संभाजीनगर येथील कैलास पब्लिकेशन च्या दालनात भेट दिलेला आहे. यामध्ये एकूण नामवंत 18 गझलकारांच्या गजलांचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समाविष्ट आहे. याप्रसंगी कैलास पब्लिकेशनचे अनिल अतकरे आणि त्यांची पत्नी व पब्लिकेशनचे प्रकाशशनस्थळातील सर्व कामगार या प्रसंगी उपस्थित होते. शेवटी चहापाणी घेऊन गझलसंग्रहावर चर्चा करून भेटीच्या कार्यक्रमाची सांगता झाली.

माय... तू होती तेव्हा

माय तू होती तेव्हा
दिवाळीला मजा होती
मामाचं गाव होतं
गणगोतात नाव होतं

मातीच्या पणतीला
मायेचीच वात होती
अमावस्येच्या रात्री ही
उजेडाची बरसात होती

देवळासोबत उखाड्यावर
एक पणती तेवायची
मातीच्या घरामधे
दिवाळी सजायची

फराळाच्या ताटामध्ये
तुझ्या हातचे लाडू होते
ओवाळणीच्या ताटामध्ये
लाह्या बत्तासे करदोरे होते

बापाच्या घामाचा गंध
नव्या कपड्याला यायचा
रांगोळीच्या अंगणातून
आवाज फटाक्यांचा व्हायचा

आज ही दिवाळी येते
तुझ्या विना उदास जाते
दारातल्या रांगोळीला
माय तुझीच आठवण येते

ज्ञानेश्वर गायके,
कन्नड

प्रवेश सुरू

बी.ए. मराठी व उर्दू माध्यम

एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू

बालसंगोपन

डीप्लोमा गांधी विचार

मानवी हक्क प्रमाणपत्र

संपर्क

9405109103

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार ०४ नोव्हेंबर २०२६

इनामी देवस्थान जमिनीच्या कायद्याविरोधात छत्रपती संभाजीनगरमध्ये आक्रोश मेळावा



छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्र सरकारकडून देवस्थान इनामी जमिनींसंदर्भात प्रस्तावित करण्यात येत असलेल्या नवीन कायद्याच्या विरोधात आज छत्रपती संभाजीनगर येथे परशुराम सेवा संघ आणि देवस्थान इनामी जमीन संघटनेच्या वतीने आक्रोश मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. या मेळाव्यात पुजारी वर्ग, जमीनधारक आणि संबंधित समाजबांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होत सरकारच्या प्रस्तावित कायद्याविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.गावोगावी हिंदू धार्मिक परंपरा आणि देवस्थानांची सेवा जपणाऱ्या पुजारी वर्गाच्या उपजीविकेवर या कायद्यामुळे परिणाम होण्याची भीती मेळाव्यात व्यक्त करण्यात आली. सरकारने नियुक्त केलेल्या कायदा समितीमध्ये संबंधित जमीनधारक आणि या विषयावर काम करणाऱ्या संघटनांना योग्य प्रतिनिधित्व देण्यात आलेले नाही. त्यामुळे ही समिती तातडीने बरखास्त करावी, अशी मागणी आंदोलकांनी केली.सरकार नेमका हा कायदा कोणाच्या हितासाठी तयार करत आहे, समाजाच्या हितासाठी की धनदांडग्यांच्या फायद्यासाठी, असा सवाल उपस्थित करत या प्रक्रियेच्या उद्देशाबाबत कार्यकर्त्यांनी संशय व्यक्त केला. संबंधित संघटनांशी कोणतीही चर्चा न करता कायद्याची प्रक्रिया पुढे नेली जात असल्याबद्दलही नाराजी व्यक्त करण्यात आली.इनामी जमिनी वर्ग-1 मध्ये समाविष्ट करून कायद्यासमोर सर्वांना समान न्याय द्यावा, बेकायदेशीररीत्या हस्तांतरित झालेल्या जमिनींची चौकशी करून मूळ जमीनधारकांना न्याय द्यावा, पुजाऱ्यांचे हक्क अबाधित ठेवावेत, बंद असलेल्या वारस नोंदी पुन्हा सुरू कराव्यात, तसेच इनामी जमीनधारक शेतकऱ्यांनाही पीककर्ज आणि शासनाच्या विविध कृषी योजनांचा लाभ द्यावा, अशा प्रमुख मागण्या यावेळी करण्यात आल्या.सरकारने मागण्यांचा गांभीर्याने विचार न केल्यास येत्या काही दिवसांत उपोषण सुरू करण्यात येईल. तसेच सरकारला कायदेशीर नोटिसा पाठविण्यात आल्या असून, भविष्यात न्यायालयीन लढाही उभारण्यात येईल, असा इशारा आंदोलकांनी दिला.अण्णासाहेब पाटील गुरव समाज मंडळाचे अध्यक्ष यांनी सरकारला इशारा देताना सांगितले की, गरीब पुजारी आणि जमीनधारकांवर अन्याय झाल्यास त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील. सरकारने आमच्या मागण्यांकडे दुर्लक्ष करू नये. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.देवस्थान इनामी जमिनींच्या प्रश्नावर सरकारने संबंधित संघटना आणि जमीनधारकांशी चर्चा करून योग्य तोडगा काढावा, अशी मागणी या आक्रोश मेळाव्यातून करण्यात आली. या वेळी प्रदेशाध्यक्ष श्री विश्वजीत देशपांडे, अखिल गुरव समाज संघटनेचे अध्यक्ष अण्णासाहेब शिंदे, दशनाम गिरी गोसावी समाजाचे अध्यक्ष ओम प्रकाश गिरी, मराठवाडा इनाम हक्क परिषदेचे अध्यक्ष ॲड. राजेंद्र बन, ॲड. रविराज जोशी, सुनील कुलकर्णी, अरविंद कुलकर्णी , ॲड. स्वप्निल देशमुख ,राम महाराज, प्रदिप भाले,गजानन जोशी रोषनगावकर यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गजानन जोशी रोशनगावकर तर आभार प्रदर्शन गणेश जाधव यांनी केले. जितेंद्र भाले, दिलीप सोनवणे, दत्तू चव्हाण, कचरूदास वैष्णव, बापुसाहेब जोशी राजेश गिरी,बालुदास वैष्णव,सागर वैष्णव यांनी या कार्यक्रम यशस्वीतेसाठी मराठवाडा मुख्य समन्वयक गजानन जोशी रोशनगावकर परिश्रम घेतले.

सरकारने केली गरीब जनतेची फसवणूक मोफत रक्त तपासणी सेवा बंद

कन्नड : राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि 'आपला दवाखाना' या शासकीय आरोग्य संस्थेमधील महा लॅबच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या प्रयोगशाळा तपासण्या आणि रक्तनमुना संकलन सेवा अचानक बंद झाल्या आहेत. एचएलएल कंपनीची शासनाकडील मागील दोन वर्षांपासूनची देयके प्रलंबित असल्याने या सेवा बंद पडल्याची माहिती समोर आली आहे. परिणामी, ग्रामीण आणि शहरी भागातील गरीब व गरजू रुग्णांची मोठी गैरसोय होत असून, मोफत किंवा अल्प दरात उपलब्ध होणाऱ्या तपासण्यांसाठी आता खाजगी प्रयोगशाळांचा आधार घ्यावा लागत आहे.सर्वसामान्य नागरिकांना शासकीय आरोग्य संस्थांमध्ये महा लॅबच्या माध्यमातून विविध प्रयोगशाळा तपासण्या आणि रक्तनमुना संकलनाची सुविधा उपलब्ध होती. आधिक्यदृष्ट्या दुर्बल रुग्णांसाठी ही सेवा महत्त्वाची आधार ठरत होती; मात्र सेवा बंद झाल्याने रुग्णांना खाजगी प्रयोगशाळांमध्ये जाऊन तपासण्या कराव्या लागत आहेत. खाजगी लॅबमधील तपासण्यांचे दर सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जात आहे.

प्रतिनिधी नेमणे आहे

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहेत. तालुक्यातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक क्षेत्राची माहिती असणाऱ्यास प्राध्यान्य ! इच्छुकांनी आपला अल्पपरिचय (बायोडाटा) ७५८८००५००२ या नंबरवर Whatsup करावा.

दै. महाराष्ट्र जनशक्ती हे महाराष्ट्रातील मराठी भाषेत वाचले जाणारे प्रमुख ई-दैनिक आहे. आपल्या व्यवसायाची जाहिरात करून व्यवसायवृद्धी करा.

अजिंठा डोंगर रांगेतील जलविद्युत प्रकल्पा विरोधात "शिवार फेरी" आंदोलन



कन्नड (अरुण थोरात) : राज्यभर भीमाशंकर- कर्जत येथील जलविद्युत प्रकल्पा विरोधामध्ये वातावरण तापलेले आहे. सह्याद्रीची उपरांग असलेल्या अजिंठा डोंगरातील राखीव वन क्षेत्रात येणाऱ्या नायगाव- वडोद येथे प्रस्तावित असलेल्या ग्रीन को एनर्जी या कंपनीच्या पी एस पी स्वरूपाच्या या जलविद्युत निर्मिती प्रकल्पामुळे डोंगराच्या खालच्या बाजूस असणारी एक लाख 73 हजार वृक्ष ही या प्रकल्पासाठी तोडली जानार असा अहवाल सोयगाव वनपरिक्षेत्र कार्यालयाने वरिष्ठांना दिला आहे. ही संख्या खालच्या बाजूस असणाऱ्या नायगाव- वाडी येथील आहे तर प्रकल्पाच्या वरच्या बाजूस येणाऱ्या वडोद विठ्ठलाचे या भागातील वृक्ष गणना गावकऱ्यांनी हाणून पाडल्यामुळे तेथील वृक्ष गणना होऊ शकली नाही. वरच्या भागातील घनदाट वृक्ष संपदा लक्षात घेता या प्रकल्पासाठी दोन लाखाच्या वर भारतीय प्रजातीची वृक्ष तोडले जाऊ शकतात. लाखो वृक्षांबरोबर खालच्या बाजूस असणारे नऊ माती नाला बांध बंधारे व 9 वनराई बंधारे ही यात उद्ध्वस्त होणार आहे. सिल्लोड येथील पर्यावरण संवर्धक व सोयगाव वनपरीक्षेत्र विभागाच्या वन्यजीव मनुष्य संघर्ष समितीचे सदस्य असलेले डॉ. संतोष पाटील हे दोन वर्षांपासून या प्रकल्प विरोधामध्ये शासन दरबारी लढा देत आहे. वाडी - नायगाव येथील स्थानिक शेतकऱ्यांच्या भेटी घेत व वाडी येथील आबा पाटील गव्हाणे , प्रफुल्ल पाटील, रवी राठोड यांनी शेतकऱ्यांमध्ये जागृती म्हणून श्वास देणाऱ्या जंगलासाठी शेवटचा श्वास ही संकल्पना आखत या भागात युवकांसह शिवार फेरीतून निदर्शन केले. मोहाची शेकडो झाडे या कामी तोडले जाणार असून काही झाडे तर 200 वर्ष वयाची असून 20 फुटापर्यंत घेर आहे.हा भाग गौताळा अभयारण्य पासून अवघ्या 14 किमी हवाई अंतरावर आहे. या दोन्ही प्रकल्पामुळे हिवरा, पूर्णा, मनुदेवी, खटकाळ, बहुळा, चारणा, खेळणा या नद्या प्रभावित होतील. लाखो लोकांना व हजारो हेक्टर शेत जमिनीस याची झळ बसेल व पर्जन्य छायेतील या भागास हे कदापी परवडणारे नाही. या डोंगरी वनक्षेत्रात टी1 सी1 या सांकेतिक क्रमांकाचा पट्टेरी वाघ ठाणे भागात दिसला होता तर t1C3 या पट्टेरी वाघाचे सध्या वास्तव्य 10 ते 11 किमी. हवाई अंतरावर गौताळा वन्यजीव अभयारन्यात आज ही असून त्याचा हा परिसर भ्रमण मार्ग आहे व याच मार्गातून सदर वाघ विदर्भातील ज्ञानगंगा व टिपेश्वर अभयारण्य या भागात वावरत असतो. खवले मांजर, बिबट्या, अस्वल, लांडगे, कोल्हा, हरीण, भेकरे, तडस, काळवीट, अजगर, हिरवा चापडा, आदी शेकडो वन्यजीवांचा भ्रमण(कॉरिडॉर) मार्ग व अधिवास येथे आहे.चौकट_ही हिरवी भिंत(ग्रीन वॉल) जिल्ह्याचे फुफ्फुस- पूर्ण वाढ झालेले एक झाड रोज 300 लिटर लिटर प्राणवायु वातावरणात उत्सर्जन करते. त्या अर्थी ही 1 लाख 73 हजार खालच्या बाजूची व 40 हजार हून अधिक माथ्यावरची वडोद भागातील अशी 2 लाख हून अधिक वृक्ष तोड झाली तर आपण रोज 6 कोटी लिटर ऑक्सिजन - प्राणवायु गमावून बसू , तसेच एक झाड वर्षाला 25 किलो कर्ब रुपी प्रदुषक शोषतो, त्याअर्थी 50 किलो कार्बन शोषला जाणार नाही व हा वायू हरित गृह वायू असल्याने व एल निनो निर्मितीचे एक कारण असल्याने जागतिक तापमान वाढ होईल. खान्देश भागातील उष्णतेच्या तीव्र झळा आपल्या जिल्ह्यास सोसाव्या लागतील.